**सं.फौ. ख. क्र.१११६/२०२४**
**सरकार वि. रामनाथ**
**निशाणी क्रमांक – ११**

**सरकार तर्फे साक्षीदार क्रं. ०१ यांची जबानी**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करते की,

**माझे नाव** - अर्चना नितेश उईके
**वय** – ३८ वर्षे, व्यसाय : पोलिस पाटील
**राहणार** - मौदी, रामटेक

<u>सरतपास शपथेवर सुरु</u> :-

<u>सरतपास सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्रीमती रणवरे मॅडम यांच्यामार्फत</u> :-

१) पोलिसांनी मला पंचनाम्यासाठी दि.०८.०९.२०२४ रोजी मौदी येथे बोलवले होते. मला पोलिसांनी फोन करून बोलाविले होते व संमस दिले होते. आता मला सदर संमस दाखविण्यात आले. ते तेच असून त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.१९** देण्यात येते. त्यानुसार मी घटनास्थळ गेली. आमच्या सोबत मडावी सर व हरळ सर होते. साहेबांनी आरोपीच्या घरात जावून पाहिले असता त्याच्या घरातून ५ लिटरच्या दोन पांढऱ्या रंगाच्या डबक्या मध्ये एकूण १० लिटर मोहाफुल दारु मिळून आली.

२) ती माझ्यासमक्ष जप्त करुन त्याचा पंचनामा केला. आता मला सदरचा पंचनामा दाखविण्यात आला. ते तेच असून त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.२०** देण्यात येते. त्यानंतर त्या दारु पैकी सिए तपासणीसाठी नमुने माझ्यासमक्ष काढले व सिलबंद केले. माझ्यासोबत दुसरा पंच वैशाली सलामे ही हजर होती. त्या नमुन्यावर माझी व वैशालीची सही होती. त्यानंतर आरोपीला सोबत घेवून गेले. उर्वरित दारु जागेवर नष्ट केली. पोलिसांनी माझे बयाण घेतले होते. मी आरोपीला ओळखते तो आज न्यायालयात हजर आहे.

**सरतपास पुर्ण.**

<u>उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञ श्री.गुप्ता यांच्यामार्फत</u> :-

३) माझे १२व्वी पर्यंत शिक्षण झाले आहे. हे म्हणणे खरे आहे की, नि.क्र.१९ मध्ये वेळ नमुद नाही. हे म्हणणे खरे आहे की, मडावी साहेबांनी मला फोन करुन मौदीच्या बाहेर म्हणजे पवनी येथे बोलाविले होते. माझे व आरोपीचे घर १० मिनीटाच्या अंतरावर आहे. मौदी गावात अंदाजे ६० घर असतील. मी आरोपीला पहिलेपासून ओळखते. हे म्हणणे खरे आहे की, मी नि.क्र.१९ व २० वर एकाच वेळी सही केली.

४) हे म्हणणे खरे नाही की, पोलिसांनी मला पंचनाम्यासाठी दि.०८.०९.२०२४ रोजी मौदी येथे बोलवले होते, मला पोलिसांनी फोन करून बोलाविले होते व संमस दिले होते, त्यानुसार मी घटनास्थळ गेली, आमच्या सोबत मडावी सर व हरळ सर होते, साहेबांनी आरोपीच्या घरात जावून पाहिले असता त्याच्या घरातून ५ लिटरच्या दोन पांढऱ्या रंगाच्या डबक्या मध्ये एकूण १०

लिटर मोहाफुल दारु मिळून आली, ती माझ्यासमक्ष जप्त करुन त्याचा पंचनामा केला, त्यानंतर त्या दारु पैकी सिए तपासणीसाठी नमुने माझ्यासमक्ष काढले व सिलबंद केले, माझ्यासोबत दुसरा पंच वैशाली सलामे ही हजर होती, त्या नमुन्यावर माझी व वैशालीची सही होती, त्यानंतर आरोपीला सोबत घेवून गेले, उर्वरित दारु जागेवर नष्ट केली, पोलिसांनी माझे बयाण घेतले होते, हे मी खोटे सांगत आहे.

५) हे म्हणणे खरे आहे की, मी पोलिस पाटील असल्याने आमची मिटींग पोलिस स्टेशनला होत असते. हे म्हणणे खरे आहे की, मी नि.क्र.१९व २० वर पोलिस स्टेशनला सही केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी पोलिसांच्या सांगण्यावरुन खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**
**फेरतपास काही नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत,

माझे समक्ष,
सही/-

रामटेक.
दिनांक : १०/०३/२०२६.

(डी. सी. वोराणी)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, रामटेक